# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९,खेरवाडी, बांद्रा (पूर्व ),मुंबई -४०० ०५१.

**दू.क्र. : ०२२-६२५४२१००/१०५/१०६**

**ई.मेल : secretary @ msbte.com** **संकेतस्थळ:www.msbte.org.in**


---

जा.क्र.मरातंशिमं/का-४२/हिवाळी परीक्षा-२०/२०२१/ 313 दिनांक 10 FEB 2021

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यता प्राप्त

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था (अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र )

**विषय :- हिवाळी परीक्षा-२०२०- ऑनलाईन MOCK Test (सराव परीक्षा) देणेबाबत**

**संदर्भ :-** १.मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-४०/लले/हि.प.२०/२०२१/०२१/दि.०४/०२/२०२१

२. No. MSBTE/D-42/W20 exam/2021/ 312 date 10/02/2021

३.No. MSBTE/D-42/W20 exam/2021/ 311 date 10/02/2021

उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार हिवाळी परीक्षा २०२० च्या आयोजनाबाबत सर्व संस्था व विद्यार्थांना अवगत करण्यात आलेली आहे.

सर्व विद्यार्थ्यांना हिवाळी परीक्षा २०२० च्या सैद्धांतिक ऑनलाईन परीक्षेचा सराव होण्याकरीता दि.२४/०२/२०२१ व दि.२५/०२/२०२१ रोजी ऑनलाईन MOCK Test (सराव परीक्षा) आयोजित करण्यात येणार आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांना (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षासाठी शैक्षणिक वर्ष २०२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसह ) आवाहन करण्यात येते की, त्यांनी दि.२४/०२/२०२१ व दि.२५/०२/२०२१ रोजी होणा-या ऑनलाईन MOCK Test ही सराव परीक्षा द्यावी. या सराव परीक्षेच्या वेळा खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | परीक्षेचा दिनांक | कालावधी |
|---|---|---|
| १. | दि.२४/०२/२०२१ ( बुधवार ) | सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| २. | दि.२५/०२/२०२१ (गुरूवार ) | सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत |

**टिप :- ज्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा दि.२४/०२/२०२१ रोजी पूर्वी संपुष्टात आली आहे त्यांनी दि.२४/०२/२०२१ रोजी व ज्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा दि.२४/०२/२०२१ रोजी आहे अशा विद्यार्थ्यांनी दि.२५/०२/२०२१ रोजी MOCK Test (सराव परीक्षा) द्यावी.**

सदर परीक्षेसाठी आवश्यक असणारे Login ID, Password व Link इत्यादी मंडळाकडे नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर SMS द्वारे दि. २२/०२/२०२१ रोजी पाठविण्यात येतील. सदर Login ID, Password हे दि. ०२/०३/२०२१ पासून सूरू होणा-या (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षासाठी शैक्षणिक वर्ष २०२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना दि.२४/०३/२०२१ पासून सुरू होण-या ) ऑनलाईन हिवाळी परीक्षा २०२० करीता देखिल लागू असल्याने विद्यार्थांनी हिवाळी परीक्षा २०२० संपेपर्यंत ते सांभाळून ठेवण्याची दक्षता बाळगावी.

ऑनलाईन परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना काही अडचण आल्यास, त्यांनी आपल्या संस्थेतील विभागीय समन्वयक (Departmental Coorodinator) यांच्याशी संपर्क साधावा. विभागीय समन्वयकाचा मोबाईल नंबर विद्यार्थ्यांना SMS द्वारे कळविला जाईल. सराव परीक्षा देण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी वरील संदर्भ क्र.२ मधील परिपत्रकात दिलेल्या Instructions / Guidelines वाचून त्याचे तंतोतंत पालन करावे.

सर्व संस्था प्रमुखांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे व दि.२४/०२/२०२१ व दि.२५/०२/२०२१ रोजी होण-या ऑनलाईन MOCK Test सराव परीक्षेस सर्व विद्यार्थी बसतील याची दक्षता घ्यावी. सर्व संस्था प्रमूख व संस्थेतील सर्व विभागीय समन्वयक यांनी संदर्भ क्र.३ मधील परिपत्रकात संस्थेसाठी देण्यात आलेल्या Instructions / Guidelines चे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घ्यावी.

( डॉ. महेंद्र रा. चितलांगे )
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी –
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई,पुणे,नागपूर व औरंगाबाद.